ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– III May - June 2021

# आधुनिक भारतीय समाजातील शिक्षण आणि शिक्षकाचे बदलते स्थान

**प्रा. लक्ष्मण पाटील**

*जळगाव*

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at http://www.aarhat.com/erj/

**संक्षिप्त गोषवारा**

शिक्षण हे समाजाचे अत्यंत महत्वाचे अंग आहे, भारतीय राज्यघटनेने शिक्षणाचा दिलेला मुलभूत अधिकार राखून प्रगती करण्यासाठी समाजातील सर्व घटकांना पूरक, आवश्यक साधनसुविधांच्या सोयीनी युक्त आणि शिक्षकसुलभ शैक्षणिक धोरणाची देशाला गरज आहे. त्यामुळे, सर्व सामाजिक घटकांना पूरक धोरण आखून प्रोत्साहित करण्यासाठी आवश्यक घटकांचा थोडक्यात उहापोह महाराष्ट्रातील सद्यस्थितीच्या संदर्भाने या शोधनिबंधात केला आहे.

**प्रस्तावना:**

मानवी समाज व्यवस्थेत शिक्षणाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. भारतीय राजव्यवस्थेमध्ये हे स्थान अबाधित राखण्यासाठी भारतीय राज्यघटनेत शिक्षण हा विषय केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या सामाईक यादीत समाविष्ट करण्यात आला आहे. म्हणजेच, सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्द करून देण्याची जबाबदारी राज्य सरकार आणि केंद्र सरकार या दोघांची आहे. समाजातील गरीब, वंचित, मागास अल्पसंख्य घटकांना शिक्षण संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था देखील सांभाळतात. त्यामुळेच, महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हापरिषद या मोफत शालेय शिक्षण देण्याची मर्यादित जबाबदारी घेतात.

**स्वातंत्र्योत्तर शिक्षण व्यवस्था:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ मध्ये भारत सरकारपुढे निरक्षरता आणि शिक्षणाच्या प्रसाराचा गंभीर प्रश्न उभा राहिला होता. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या माध्यमातून विविध ध्येय धोरणांचा पुरस्कर केला जात होता. स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अब्दुल कलाम आजाद यांच्या पुढाकाराने स्वतंत्र भारताची आधुनिक शिक्षणप्रणाली विकसित करण्यासाठी १९४८ मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. याद्वारे शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, स्वतंत्र भारताच्या नव्याने निर्माण झालेल्या गरजा, आकांक्षा यांची पूर्तता करणे, भारतीय संविधानाच्या ध्येय-धोरणांचा पाठपुरावा करून जनमाणसात त्यासंबंधीची जागरूकता निर्माण करणे, भारताला विज्ञान व आधुनिकतेच्या जोडीने विकासाच्या वाटेवर मार्गस्थ करणे ही शैक्षणिक धोरणे राबविण्यामागील प्रमुख भूमिका होती. याची गतिशीलता वाढवण्यासाठी सन १९५२ मध्ये माध्यमिक शिक्षण आयोग, सन १९६१ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, सन १९६४-६६ या काळात कोठारी कमिशन, सन १९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, सन १९८६ मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांच्या माध्यमातून

ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– III May - June 2021

पूरक प्रयत्न करण्यात आले. या सर्व प्रयत्नांमध्ये आधुनिक भारतील शिक्षणाची ध्येये वा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक या घटकाची भूमिका मध्यवर्ती मानली गेली आहे.

**शिक्षण स्तर:**

भारतीय शिक्षण पद्धतीत सर्वत्र एकवाक्यतेचा अभाव आहे. तरीही, भारतीय राज्यघटनेनुसार केवळ ६ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या शिक्षण नियंत्रणासाठी सरकारी नियम लागू आहेत. त्यानुसार पहिल्या वर्गात प्रवेशित मुलाचे वय ६ वर्ष अपेक्षित आहे. ६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांच्या शिक्षणास पूर्वप्राथमिक शिक्षण म्हणून मान्यता आहे. मराठी माध्यमात यासाठी महाराष्ट्रात अंगणवाड्या आणि बालवाड्या आहेत. इंग्रजी माध्यमात जर्मन शिक्षण पद्धतीनुसार किंडरगार्डन, प्री केजी, जुनिअर केजी, सिनियर केजी असे स्तर आहेत. महाराष्ट्रात सहाव्या वर्षी पहिलीत जाणारा विद्यार्थी दहाव्या वर्षी चौथी उत्तीर्ण होऊ शकतो. इथे त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होते. पुढे पाचवी ते सातवी पर्यंतचे शिक्षण माध्यमिक शिक्षण म्हणून आणि आठवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण उच्च माध्यमिक म्हणून गणले जाते. इयत्ता अकरावी व बारावी चे शिक्षण कनिष्ठ महाविद्यालयीन समजले जाते आणि त्यानंतरचे पदवी व पदव्युतर शिक्षण उच्च शिक्षण मानले जाते. पण दिल्लीमध्ये मात्र ५ वी उत्तीर्ण झाल्यावर प्राथमिक शिक्षण पूर्ण होते तर काही राज्यात पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण हे प्राथमिक, दहावीचे माध्यमिक आणि अकरावी-बारावीचे उच्च माध्यमिक अशी गणना होते. तरीही, भारतीय राज्यघटनेनुसार भारतात सर्वत्र विद्यार्थ्यांचा वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंतच्या शिक्षणाची सोय करून देणे ही सरकारची जबाबदारी मानली आहे.

**महाराष्ट्रातील सद्यस्थिती:**

महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्राला अधिक प्रतिष्ठा दिली जाते. परंतु त्यामुळे शिक्षणाला अधिक व्यापक करताना खाजगीकरणामुळे व्यापारी स्वरूप प्राप्त झाले आहे, दिवसेंदिवस त्यात व्यावसायिक दृष्टीकोन वाढतो आहे. अनेक राजकीय नेत्यांनी शिक्षण संस्थांची उभारणी करून शिक्षण खेत्रावर वर्चस्व निर्माण केले आहे. फक्त अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणच नव्हे तर पारंपारिक पदवी शिक्षणात देखील व्यावसायिक दृष्टीकोन वाढला आहे. त्यामुळे सरकारी शाळांच्या विकासाकडे पूरक लक्ष देण्याऐवजी या शिक्षण सम्राटांचा खाजगी शाळांच्या विकासाकडे अधिक कल आहे. त्यामुळे, परिणामत: सरकारी शाळांबाबत सरकारची उदासीनता वाढत चालल्याने मोफत शिक्षण पुरविणाऱ्या सरकारी शाळांपेक्षा खर्चिक खाजगी शाळांना अधिक महत्व प्राप्त होत आहे. किंबहुना, खासगी शाळांमध्ये पाल्यांना शिक्षण देणे हे प्रतिष्ठेचे लक्षण समजण्यात येऊन परिस्थिती खाजगीकरणाचे महत्व अधोरेखित करीत आहे. हीच स्थिती महाविद्यालयांची आहे. सध्या महाराष्ट्रात सुमारे २,२०० महाविद्यालये, १९,७६७ हून अधिक माध्यमिक शाळा (यापैकी १५,४६६ मराठी माध्यमाच्या) आणि ७५,६६६ पैकी ६५,३२१ हून अधिक मराठी प्राथमिक शाळा

आहेत. एकंदरीत ८७% प्राथमिक शाळा आणि ७८% माध्यमिक शाळा मराठी माध्यमाच्या आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या ५, २१३ प्राथमिक आणि २,५२८ माध्यमिक इतकी आहे. २४ नोव्हेंबर २००१ रोजी शासनाने कायम विनाअनुदानित तत्वाला धोरणात्मक मान्यता दिल्याने प्रचंड उलथपालथ झाली आहे. या प्रचंड शिक्षण विस्तारामुळे अर्थातच या शिक्षण व्यवस्थेत काम करणाऱ्या शिक्षक-प्राध्यापकांची संख्याही कांही लाखात आहे. अर्थातच, विद्यार्थ्यांची संख्या तर कोटींमध्ये आहे. त्यामुळे सरकारच्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम या सर्वांवर होणे साहजिक आहे. म्हणूनच नवीन शिक्षण धोरणाची विविध अंगाने चिकित्सा होणे आवश्यक आहे. शिक्षण पद्धती व शिक्षा हे यातील प्रमुख अंग चिकित्सेसाठी आवश्यक आहेत.

**शिक्षण प्रणालीत शिक्षकाचे स्थान:**

संपूर्ण शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि अभ्यासक्रम हे तीनही घटक महत्त्वाचे आहेत. शिक्षकाशिवाय शिक्षण प्रक्रिया घडत नाही. प्राचीन काळी भारतीय समाजात शिक्षकाचे स्थान सर्वोच्च होते. शिक्षकी पेशा किंवा शिक्षण व्यवसाय हा समाजातील विविध व्यवसाय पैकीच एक मानला आहे. प्रत्येक व्यवसायाचे समाजजीवनात एक विशिष्ट स्थान असते व ते महत्वाचे असते. हे स्थान वा महत्व त्या व्यवसायाच्या कार्यावरून व समाजाच्या प्रागतिक वाटचालीतील त्याच्या वाट्यावरून ठरत असते. मानवी जीवन उंचावणाऱ्या मूल्यांची पूर्तता करणारा व्यवसाय हा श्रेष्ठ व्यवसाय मानला जातो. मानवी जीवन उंचावणाऱ्या मूल्यांची पूर्तता करणारा प्रभावी घटक म्हणून शिक्षकाचे स्थान अनन्यसाधारण आहे.

शिक्षक म्हणजे समाजाचा खरा शिल्पकार होय. समाजाचे शिल्पकार म्हणजेच शिक्षक स्वतः साठी कधीच जगत नाहीत तर समाजाचे उज्वल भवितव्य उर्जावान बनविण्यासाठी जगतात. तथागत गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा बीबी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पुर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम, यासारख्या समाजाच्या शिल्पकारामुळे आदर्श शिक्षक परंपरा भारतात विकसित झाली आहे.

शिक्षक कसा असावा याबाबत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, समतोल बुद्धी, निष्पक्षपाती व थोर मनाचे शिक्षक असले पाहिजे. याचा अर्थ असा की, समाज बालक यांच्या जडणघडणीतील महत्वाचा घटक म्हणून शिक्षकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिक पातळीवर विविध देशामध्ये आर्थिक सुधारणाविषयक राबविण्यास सुरुवात झाली. विशेषतः अविकसित आणि विकसनशील देशामध्ये हे सुधार कार्यक्रम अनिवार्यपणे राबविले जाऊ लागले. त्याचा परिणाम भारतात विविध घटकावर झाल्याचे 1991 नवीन आर्थिक धोरणावरून स्पष्ट होते. भारतात नवीन आर्थिक धोरणामध्ये, खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाला चालना देण्यात आली. याचा दूरगामी परिणाम भारतातील विविध घटकांपैकी शिक्षण व्यवस्था आणि शिक्षक वर्गावर झाल्याचे दिसून येते. त्यामुळे उभ्या राहिलेल्या नवीन आव्हानांना भारतीय शिक्षण व्यवस्था सामोरी जात आहे.

ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– III May - June 2021

**शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने**: शिक्षण व्यवस्थेसमोर आज अनेक आव्हाने आहेत. त्यापैकी काही प्रमुख आव्हाने पुढील प्रमाणे आहेत;

१. **खाजगी शिक्षणसंस्थांची वाढती संख्या**: भारतीय शिक्षण क्षेत्रात खाजगी शिक्षण संस्थांचा उदय व विकास हा आर्थिक सुधार कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणात झाला आहे. उदारीकरणाच्या माध्यमांतून विदेशी शिक्षण संस्थांचे अभ्यासक्रमदेखील भारतात उपलब्ध होऊ लागले आहेत. खाजगी शिक्षण संस्थांचा मुद्दा गुणवत्तेच्यादृष्टीने सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही दृष्टीने आव्हान म्हणून उभा ठाकतो. काही शिक्षण संस्थांची गुणवत्ता ही वादातीत असते व ती टिकवून ठेवण्यासाठी हया संस्था आटोकाट प्रयत्न करतात. याउलट काही शिक्षण संस्था विद्यार्थी संख्या वाढवून सवंग लोकप्रियतेच्या बळावर गुणवत्ता, परीक्षा पद्धतीतील उच्च मानदंड, पारदर्शिता, निरपेक्षता इ. मुल्यांशी तडजोड करतात व अयोग्य मार्गाचा अवलंब करून शिक्षण क्षेत्रात गैरमार्ग रुजविण्याचा प्रयत्न करतात. अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षण संस्थांचे आव्हान सद्यपरिस्थितीत उभे आहे.

२. **गुणवत्ता वाढ**: आर्थिक सुधारणांचे धोरण भारताने स्वीकारल्यानंतर जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल करणे अपेक्षित होते. भारतीय अभ्यासक्रम, पदवी, परीक्षा पद्धती, अध्यापन पद्धती, संशोधन इ. घटकांचा स्तर हा आंतरराष्ट्रीय शिक्षण प्रणालीच्या स्तराशी साम्य राखणारा हवा. त्यादृष्टीने भारतीय शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे एक महत्वाचे आव्हान आज भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोर उभे आहे.

३. **शैक्षणिक स्थलांतराचा प्रश्न**: शैक्षणिक आर्थिक सुधारणा नंतरच्या काळातील प्रकर्षाने उभा राहिलेल्या एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय शिक्षण पद्धतीला उभे राहिलेले एक कडवे आव्हान आहे. कारण भारतात शिक्षण घेतल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिका आणि विकसित राष्ट्रामध्ये स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे.इ.स.२००४-०५ मध्ये भारतातून अमेरिकेत गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १२,००० एवढी होती. याउलट अमेरिकेतून भारतात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २०३ एवढीच होती.

४. **शैक्षणिक समानतेचा प्रश्न:** आर्थिक सुधारणानंतरच्या काळात शैक्षणिक समानतेचा प्रश्न हा एक कळीचा प्रश्न असून भारतासह जगातील अनेक विकसनशील व आर्थिक दृष्ट्या मागास राष्ट्रांच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान आहे. लिंगभावातील असमानता हा देखील शैक्षणिक समानतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

५. **ई- शिक्षण प्रणाली**: ई-शिक्षण म्हणजे इंटरनेट, संगणक यासारख्या इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून दिले जाणारे शिक्षण होय. शिक्षण प्रक्रियेसाठी एक माध्यम म्हणून शिक्षणसंस्था, शाळा, महाविद्यालये यांची जागा काही प्रमाणात ही ई-उपकरणे घेऊ लागली आहेत.

ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– III May - June 2021

शिक्षण ही आधुनिक समाजाची एक प्रमुख उपव्यवस्था आहे. सरकारने शिक्षणाकडे पूरक आणि परिपूर्ण विकासात्मक दृष्टीने पाहण्याची गरज आहे आणि संपूर्ण समाजाने शिक्षणाच्या प्रगतीमध्ये सक्रीय योगदान देण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाने समाजाला प्रगतीशील नेतृत्व द्यावे ही समाजाची अपेक्षा असते. एकूण सामाजिक प्रगतीसाठी फक्त समाजसुधारक आणि विचारवंत यांचेच योगदान पुरेसे ठरत नाही. त्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकांनी जाणीव पूर्वक सक्रीय योगदान दिले पाहिजे. समाज आणि शिक्षणाचे परस्परावलंबीत्व सरकार आणि समाज या दोन्ही घटकांनी नित समजून घेतले पाहिजे. शैक्षणिक धोरण ठरविताना यात अभिप्रेत मुख्य घटक विध्यार्थ्यांना शिक्षण विषयक अंतर्दृष्टी येण्यासाठी अध्यापन, अध्ययन, प्रशासन, व्यवस्थापन या सर्व घटकांची यथोचित मांडणी आवश्यक आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामुळे सर्व अंगानी बदल होत असतो, तो वेळोवेळी झाला आहे व आजही होत आहे. या सर्व बदलामुळे शिक्षकाच्या स्थानात व प्रतिष्ठेत बदल झाला आहे. आजच्या समाजात शिक्षकाची प्रतिष्ठा कमी झालेली असली तरी त्याचे समाजासाठी असलेले महत्व मात्र कायम आहे. त्यामुळे शिक्षकांच्या अस्तित्वाशी निगडीत प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षण प्रणाली विकसित केली पाहिजे, त्यानुसार शिक्षण शिक्षण धोरणात स्थान दिले गेले पाहिजे. नवीन शिक्षण धोरणात शिक्षकांसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविण्याचे उत्तम नियोजन असले पाहिजे, पूर्ण सोयीसुविशनी ते युक्त असले पाहिजे. अन्यथा शिक्षणाची वाताहत होऊन संपूर्ण समाजाला विविध परिणामाला सामोरे जावे लागते. यात गरीब, आर्थिक मागास, एससी, एसटी, व्हीजेएनटी, ओबीसी सह अल्पसंख्यांक वर्ग बळी ठरतात. म्हणून याकडे गांभीर्याने पहिले पाहिजे. उत्तम शिक्षण प्रणालीचा विकासाच देशाला प्रगतीकडे घेऊन जातो, याचा विसर पडता कामा नये.

**निष्कर्ष:** विद्यमान शिक्षण पद्धतीतील दोष दूर करून नवीन शिक्षण धोरण आखताना आवश्यक संसाधनाची पूर्तता करण्यासह शिक्षणाच्या विस्तारत कोणतीही बाधा न येऊ देता समाजातील सर्व घटकांना सामावून घेता येईल आणि त्यांना परवडेल असे शिक्षण उपलब्ध करण्याची पूरक भूमिका घेणे आणि शिक्षकांच्या भूमिकेचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**:

1. इंटरनेट संदर्भ https://maharashtratimes.com/editorial/samwad/education-student-and-feature/articleshow/66889766.cms
2. इंटरनेट संदर्भ https://mr.wikipedia.org/महाराष्ट्रातीलशिक्षणव्यवस्था